मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# देव अब्राहामाच्या प्रेमाची परीक्षा पाहतो



लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
Alastair P.
रूपान्तरकार: M. Maillot; Tammy S.

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही तो कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


एके रात्री देवाने अब्राहामाला
एक विचित्र आज्ञा केली.
अब्राहाम देवावर जितके प्रेम
करतो त्याच्यापेक्षा त्याचा मुलगा
इसहाक याच्यावर जास्त प्रेम
करतो की काय याविषयीची ही
परीक्षा होती.

देवाने आज्ञा केली की, "तुझा मुलगा इसहाक याला घे, आणि वेदीवर वेदीवर त्याचा कर."
इसहाकाचे होमार्पण? त्याच्या मुलाचे होमार्पणात अर्पण करणे?
अब्राहामसाठी ते कठीण होते.
तो त्याच्या मुलावर खुप प्रेम करत होता.



परंतु, जरी त्याला काही कळत नसेल तरी सुध्दा परमेश्वरावर भरोसा करण्याचे तो शिकला होता. इसहाक व दोन सेवक यांना घेऊन अब्राहाम सकाळीच डोंगराकडे निघाला.



तिकडे जाण्याच्या आधि,
होमार्पणाचा अग्नी पेटविण्यासाठी
अब्राहामाने लाकडे फोडून घेतली.
अब्राहामाने देवाची आज्ञा
पाळण्याचे ठरविले.





प्रवासाच्या तिसऱ्या दिवशी ते डोंगराच्या जवळ येऊन पोहचले. तेंव्हा अब्राहाम नोकरांस म्हणाला, "तुम्ही येथेच थांबा, मी आणि माझा पुत्र देवाची उपासना करावयास पलीकडे जातो आणि नंतर नाबडतोब येतो".

इसहाकाने अर्पणासाठी लागणारी
लाकडे घेतली आणि अब्राहामाने
सुरा व विस्तव घेतला.



चालता चालता इसहाकने विचारले,
"होमार्पण करण्यासाठी मेंढरु कुठे
आहे?" अब्राहामाने म्हटले, देव स्वतः
"कोऱ्याची व्यवस्था करुन देईल."



देवाने निवडलेल्या ठिकाणी ते दोघे येऊन पोहचले. तेथे, अब्राहामने एक वेदी बांधली आणि परमेश्वरासमोर होमार्पण करण्यासाठी वेदीवर लाकडे बरोबर रचून ठेवली.





अब्राहामने पुष्कळ वेद्या बांधल्या होत्या. परंतु आत्तापर्यंत बांधलेल्या सर्व वेद्यांत ही वेदी बांधणे त्याला सर्वात जास्त कठिण गेले.

अब्राहामने इसहाकाला बांधले आणि त्याच्या प्रिय पुत्राला वेदीवरील लाकडांवर ठेविले. त्याचा एकुलता एक पुत्र, प्रिय पुत्र याला खरोखर होमार्पणात यज्ञ करुन अब्राहाम देवाची आज्ञा पाळणार होता का?





होय, अब्राहामने त्याच्या हातातील सुरा उंचावला तेंव्हा त्याची धार चकाकली. त्याचे ह्दय विदीर्ण झाले असावे, परंतु त्याने परमेश्वराची आज्ञा पाळणे आवश्यक आहे हे अब्राहामला ठाऊक होते.


देवाचा दुत
मोठ्याने म्हणाला,
"थांब!" "कारण तूं
आपल्या मुलास,
आपल्या एकुलत्या
एका मुलासहि
माझ्यापासून राखून
ठेवले नाही. यावरुन
तूं देवाला भिऊन
चालणारा आहेस हे
मला कळते".


अब्राहामाने झुडपात एक एडका अडकलेला पाहिला, तेंव्हा अब्राहामने इसहाकाला बांधलेल्यातून मोकळे केले व त्याच्याऐवजी त्या ऐडक्याचे अर्पण केले. कदाचित इसहाकने असा विचार केला असावा की, "माझ्या वडीलांनी सांगितल्याप्रमाणे देवाने कोकरा पुरवून दिला".

पिता आणि पुत्र देवाची भक्ति करित असतांना, देवाच्या दुताने अब्राहामाला सांगितले, "तू माझ्या आज्ञा पाळल्या म्हणून पृथ्वीवरची सर्व राष्ट्रे तुझ्या वंशजाकडून आशीर्वादित होतील." एकेदिवशी, येशू अब्राहामाच्या वंशात जन्मास येणार.



अब्राहाम आणि इसहाक घरि परत आले. काही दिवसांनी दुःख आले. सारा मरण पावली. अब्राहामने त्याची पत्नी गमवली होती, आणि इसहाकने त्याची आई गमवली होती.



अंत्यविधिनंतर, अब्राहामने
त्याच्या एका विश्वासू दासाला
इसहाकसाठी पत्नी पाहण्यास
पाठविले. तो दास इसकासाठी पत्नी शोधण्यास
अब्राहामच्या नातलगांत त्यांच्या पुर्विच्या मायभूमित गेला.



त्या दासाने या कामी परमेश्वराकडे एक चिन्ह मागितले. "जी मुलगी माझ्या उटांना पाणी पाजेल तिच मुलगी इसहाकासाठी योग्य राहिल." ऐवढ्यात रिबकाने तेथे येऊन त्यांना पाणी दिल. ती अब्राहामाच्या नातलगांपैकी एक होती. परमेश्वराने त्याच्या प्रार्थनेचे उत्तर दिले आहे हे त्या दासाला कळले.



इसहाकाशी लग्न करण्यासाठी रिबकाने तिचे घर सोडले. इसहाकाच्या आईच्या मृत्यूनंतर तिच्यामुळे त्याला विशेष समाधान मिळाले. त्याचे तिच्यावर अतिशय प्रेम बसले!



# देव अब्राहामाच्या प्रेमाची परीक्षा पाहतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

उत्पत्ति २२-२४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16